**प्रेसनोट**

**जीवे ठार मारण्याची सुपारी घेणारा इसम युनिट-२ पथकाकडुन जेरबंद**

अमित रामभाउ लांडगे वय ३३ वर्ष धंदा- व्यापार रा.लांडगे आळी, हनुमान मंदिराजवळ भोसरी पुणे ३९ मोबाईल नं ९९६०२३४४४४ यांनी इसम नामे उदयसिंह चव्हाण यांच्याशी ओळख झाली होती त्याच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेवुन ,विश्वास संपादन करून जानेवारी, फेब्रुवारी २०१७ मध्ये ते खुप अडचणीमध्ये असल्याचे सांगुन वेळोवेळी रोख व आर.टी.जी.एस.व्दारे १८ लाख व रोख १७ लाख रूपये असे ३५ लाख रूपये माझ्याकडुन घेतलेले होतें. सुमारे दोन ते तीन महिन्यानी अमित लांडगे यांनी दिलेल्या पैशाची मागणी केली असता त्यांनी वेळोवेळी वेगवेगळया अडचणी सांगुन पैसे देण्यास टाळाटाळ करीत होते.दि.६ जोनवारी २०१८ रोजी माझ्या वर दिलेल्या पत्त्यावर तीन अनोळखी व्यक्ती आल्या त्यातील एकाने "तुमची उदय महाराज या व्यक्तीने सुपारी दिलेली असल्याचे फिर्यादी यांना सागितले ,त्यांना त्याचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली असुन त्यांची खात्री करण्याकरिता ते आले असल्याचे फिर्यादी यांना सागितले. तेव्हा उदयसिंह चव्हाण यास दिलेली रक्कम ही परत देणेसाठी वेळोवेळी त्याचा पाठपुरावा करून त्यास फोन करीत असल्याने त्याचे राग येवुन उदयसिंह चव्हाणने फिर्यादी यांना मारण्याची सुपारी दिली असल्याची खात्री झाल्याने ते पोलीस आयुक्तालयामध्ये येवुन उदयसिंह चव्हाण व इतर यांच्याविरूध्द तक्रारी अर्ज दिला होता.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन युनिट-२ पथकाने तात्काळ कराड जि.सातारा येथे जावुन उदयसिंह चव्हाण याने अमित लांडगे यास मारण्यासाठी ज्या मारेक-यांना सुपारी दिली त्याचा शोध घेतला असता कराड येथे राहणारा अमोल मदने हा मुख्य सुत्रधार असल्याची माहीती मिळाल्याने त्याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे मला मारण्याबाबत उदयसिह चव्हाण याने दिलेल्या सुपारीबाबत तपास केला असता अमोल मदने याने फिर्यादी यांना मारण्याची उदयसिंग चव्हाण उर्फ महाराज याने त्यांचा भाउ शंकर चव्हाण यांचे मार्फतीने सुपारी दिल्याचे कबुल करून त्याबदल्यात २० लाख रूपये मिळणार असल्याचे सागितले. तेव्हा उदयसिंह चव्हाण उर्फ महाराज, त्याचा भाउ शंकर चव्हाण यांनी अमित लांडगे यास जिवे ठार मारण्याचा कट करून अमित लांडगे जिवे ठार मारण्याची चिथावणी अमोल सपंत मदने वय ३२ वर्ष रा.बनवडी कॉलनी ता.कराड जि.सातारा दिल्याने सदर इसम यास रिपोर्टासह पुढील कार्यवाहीसाठी भोसरी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले असुन त्याच्यावर फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून भोसरी पोलीस स्टेशनला गुन्हा रजि नं.२०/२०१८ भादवि क .११५,१२०(ब),३४ प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री प्रदिप देशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री पंकज डहाणे, सहा पोलीस आयुक्त, श्री समीर शेख यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक सतिश निकम,सपोनि अन्सार शेख, पोलीस कर्मचारी, पो.हवा दिनेश गडांकुश,सिराज शेख,अस्लमखान पठाण,अजय खराडे,राजू केदारी,किरण पवार, पो.ना.किशोर वग्गू, अजित फरांदे,पो.शि.प्रसाद जंगिलवाड, चंद्रकांत महाजन, गणेश नरुटे यांनी केलेली आहे.